
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
जि.जळगांव
02587-223333

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:- sp.jalgaon@mahapolice.gov.in

# -: प्रेस नोट:-

दिनांक ०३/०६/२०२६

## " अमळनेर येथे बेकायदेशीर गोवंश कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई; ४,७३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त, १८ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल "

===ooo===

दिनांक ०३ जुलै २०२६ मा. **श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव**, मा. श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगांव तसेच मा. श्री. विनायक कोते, उपविभागीय पोलीस अधिकारी, अमळनेर यांच्या मार्गदर्शनाखाली व स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड तसेच अमळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय निकम यांच्या आदेशान्वये, स्थानिक गुन्हे शाखा व अमळनेर पोलीस स्टशेनच्या अधिकारी/अंमलदार त्यांच्या पथकाने अमळनेर शहरात बेकायदेशीर गोवंश कत्तलखान्यावर मोठी कारवाई केली आहे.

दिनांक ०३/०७/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी/अंमलदार यांना अमळनेर शहरातील पारधीवाडा परिसरात, मुस्लीम कब्रस्थानच्या पाठीमागे असलेल्या कत्तलखान्यात तसेच जपान जिन परिसरातील पत्रा शेडमध्ये बेकायदेशीररीत्या गोवंशाची कत्तल सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती. मिळालेल्या माहितीची पडताळणी करत दिनांक ०३/०७/२०२६ रोजी रोजी स्थानिक गुन्हे शाखा व अमळनेर पोलीस स्टेशनचे अधिकारी/अंमलदार यांचे संयुक्तपथकाने संयुक्तरीत्या छापा टाकून ही कारवाई केली. **सदर कारवाईदरम्यान एकूण १८ आरोपीतांन विरुध्द अमळनेर पोलीस स्टेशन गुन्हा रजि क्र. ३४६/२०२६ अन्वये महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा १९७६ (२०१५दुरुस्ती) कलम ५, ५अ, ९, ९(अ), ९(ब), प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६० कलम ११ तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ कलम २९९ व ३२५अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

**जप्त मुद्देमाल :-**

**१. ३,१५,०००/- रु रुपये किंमतीचे १,५७५ किलो वजनाचे गोमांस**
**२. १,५५,०००/- रु किंमतीचे ०३ गावरान बैल**
**३. ३,०००/- रु किंमतीचे ४ लोखंडी कुऱ्हाडी, ९ सुऱ्या, ६ कोयते आणि २ वजन काटे**

---------------------------------------------------------------

**एकूण ४,७३,०००/- लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल**

**सदरची कारवाई कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, मा. श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगांव, तसेच मा. श्री. विनायक कोते, उपविभागीय पोलीस अधिकारी, अमळनेर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड, अमळनेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. दत्तात्रय निकम यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पोउनि जितेंद्र अशोक वल्टे, पोउनि दीपक जगदाळे, पोहेकॉ हरीलाल पाटील, विलेश सोनवणे, रविंद्र पाटील, दिपक माळी, पोकॉ सचिन घुगे, मयुर निकम, राहुल कोळी, विलास गायकवाड तसेच अमळनेर पोलीस स्टेशनचे पोउनि शरद काकळीज व पथक या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.**

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव

*****************************************************************************************